मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 3 ऑगस्ट 2025 | पान- 1

# महापालिका सेवेतून 38 अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त

## सेवानिवृत्त होणाऱ्या 31 तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या 7 कर्मचाऱ्यांचा सह आयुक्तांच्या हस्ते सत्कार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिका सेवेत वर्षानुवर्षे कामकाज करून सेवानिवृत्त होणारे आपले सहकारी अधिकारी, कर्मचारी हे पुढील जीवनात वेगवेगळ्या वाटांवर प्रवास करणार आहेत. त्यांची जबाबदारीने कामकाज करण्याची पध्दत, सेवाभाव आणि त्यांच्या आठवणी सेवानिवृत्तीनंतरही कायम स्मरणात राहतील असे प्रतिपादन सह आयुक्त मनोज लोणकर यांनी केले आणि सेवानिवृत्तांना आरोग्य व आनंदी जीवनासाठी शुभेच्छाही दिल्या.




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, पिंपरी येथे माहे जूलै २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या ३१ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या ७ अशा एकूण ३८ कर्मचाऱ्यांचा सह आयुक्त लोणकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

या कार्यक्रमास उप आयुक्त सचिन पवार, संदीप खोत, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, बायोकेमिस्ट मीना सोनवणे, लॅब टेक्निशियन उमा जाधव, मनाली मुसळे, सुजाता साखरे, कर्मचारी महासंघाचे मनोज माछरे, नथा मातेरे, नितीन समगीर तसेच महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माहे जुलै २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, उप अभियंता विजयकुमार शिंदे, राजकुमार सूर्यवंशी, चंद्रशेखर कुर्ले, मुख्याध्यापिका अनिता रोडगे, स्मिता बांदिवडेकर, अंजना बारावे, लेखाधिकारी चारुशीला जोशी, ग्रंथालय प्रमुख कल्पना जाधव, कार्यालय अधिक्षक नामदेव लांडगे, राहुल जगताप, लेखापाल किरण शिवरात्री, मुख्य लिपिक देविदास परांडे, वंदना कुंभार, लॅब टेक्निशियन शुभांगी वैद्य, एक्सरे टेक्निशियन शलमोन मिसाळ, फार्मासिस्ट शेखर बागुल, लिपिक रमेश बारापात्रे, रसूल शेख, प्लंबर सखाराम मडके, हनुमंत देवकर, जनरेटर ऑपरेटर अनिल जगताप, वायरमन विलास तावरे, रखवालदार नरसय्या आडेप, मजूर रामदास कटके, पांडुरंग भाईप, बाळू काटे, सफाई कामगार नंदा साळवे,नवनाथ शेटे, डॉग पिग स्कोड कुली अनिल मोझे यांचा समावेश आहे.

तर स्वेछानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये सफाई सेवक चंद्रशेखर शेलार, सुरेश शिवरकर, सफाई कामगार पुष्पा बनसोडे, अर्चना रोकडे, गटरकुली अनंता दळवी, मोतीराम धोत्रे, कचरा कुली महादेव बोटे, यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माया वाकडे यांनी केले तर सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

# भरदिवसा पिंपरी कॅम्पमध्ये गोळीबार: तरुणाच्या पायावर गोळी


## गळ्यातील चेन खेचण्याच्या प्रयत्नात प्रतिकार; पोलिसांचा संशय अधिक गडद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी कॅम्प येथे शुक्रवारी (दि. १ ऑगस्ट) दुपारी भरदिवसा एका अज्ञात दुचाकीस्वाराने दुकानाबाहेर बसलेल्या तरुणावर गोळी झाडल्याची धक्कादायक घटना घडली. या गोळीबारात भावेश काकरानी (पूर्ण नाव) हा तरुण जखमी झाला असून त्याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, चोरट्याने भावेशच्या गळ्यातील चेन खेचून पळ काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या प्रतिकारात आरोपीने त्याच्या पायावर गोळी झाडली. ही घटना घडताच परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी, गुन्हे शाखेचे पथक तसेच फॉरेन्सिक युनिटने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून आरोपीच्या शोधासाठी विविध पथके रवाना करण्यात आली आहेत.



दरम्यान, पोलिसांना या घटनेत फक्त चोरीचा उद्देश नसल्याचा संशय असून विविध शक्यतांचा तपास सुरू आहे. भावेश काकरानी याच्याकडून सखोल माहिती घेतली जात असून त्याचा मोबाईल डेटा, कॉल रेकॉर्ड्स यांचाही बारकाईने आढावा घेतला जात आहे. पोलिसांकडून अधिकृत माहितीची प्रतीक्षा असून आरोपी लवकरच जेरबंद होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# हिंजवडीतील पुरस्थितीमुळे महानगरपालिका सावध

## शहरातील सर्वच नाल्यांच सर्वेक्षण पुर्ण; अनधिकृत नाल्यावरील अतिक्रमणांवर लवकरच हातोडा



**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी परिसरात काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने व पुरस्थिती निर्माण झाल्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सतर्क झाली आहे. शहरातील नाले तुंबुन पुर परिस्थिती उद्भवू नये यासाठी महापालिकेने नाल्यावरील अतिक्रमणांविरोधात कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने संपूर्ण शहरातील नाल्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले असून, लवकरच अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू होणार आहे. यामध्ये खास करून रहदारीच्या मार्गावरील तसेच पूरप्रवण क्षेत्रातील नाले व त्यांच्या सभोवताली झालेली बेकायदेशीर बांधकामे हटवली जाणार आहेत.

या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे उपायुक्त अतुल पाटील म्हणाले, "हिंजवडी परिसरात पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा अभ्यास करून आम्ही तत्काळ उपाययोजना आखत आहोत. पिंपरी-चिंचवड शहरात अशा प्रकारची परिस्थिती उद्भवू नये, यासाठी नाल्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. सर्वेक्षण पूर्ण झाले असून, लवकरच प्रत्यक्ष कारवाई सुरू होईल."

ते पुढे म्हणाले,"अतिक्रमणामुळे नाल्यांची नैसर्गिक वाहिनी अडवल्याने शहरात पाणी साचण्याचा धोका वाढतो. या कामात कोणताही राजकीय किंवा सामाजिक हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही. महापालिकेच्या या पावलामुळे शहरात संभाव्य पूरस्थिती रोखण्यास मदत होणार असून, नागरिकांनीही अतिक्रमण करण्याचे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# अजितदादांच्या विरोधात हिंजवडी ग्रामस्थ आक्रमक

## योग्य मार्ग न काढल्यास आगामी काळात न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडीच्या विकासकामांवरून ग्रामस्थ विरुद्ध उपमुख्यमंत्री अजितदादा पवार असा संघर्ष सुरू झाला आहे. गेल्या महिनाभरात अजित पवार यांनी हिंजवडीचा दोन वेळेस पाहणी दौरा केला आहे. अनेक ठिकाणी बदल करण्याच्या सूचना अजितदादा पवारांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यावर ग्रामस्थ मात्र नाराज आहेत.

अजित पवार हिंजवडी ग्रामस्थांना विश्वासात घेत नाहीत. असा आरोप सरपंच गणेश जांभुळकर यांनी केला आहे. अजित पवारांनी योग्य मार्ग न काढल्यास आगामी काळात न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार असल्याचं आजच्या ग्रामसभेत ठराव झाला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डांगे चौक आणि वाकडच्या दिशेने जाणारा रस्ता अरुंद आहे. त्याच रुंदीकरण करण्यात येणार असल्याने हिंजवडी गावठाणचा काही भाग रुंदीकरणात जाणार आहे. यावरून हिंजवडी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. सध्या हा रस्ता ३० मीटर ऐवजी २४ मीटर चा करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

या रस्त्या दरम्यान मंदिरे, शाळा, दशविधी घाट, ग्रामपंचायतच कार्यालय, स्मशानभूमी आहे. ५०- ५० वर्षांपूर्वीची घरे आहेत. यामुळे रस्ता रुंदीकरण करताना तो कमी करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थ यांनी केली आहे. याबाबत लवकरच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेऊन सांगणार असल्याचं सरपंच गणेश जांभुळकर यांनी सांगितलं आहे.

अजितदादा पवारांनी ग्रामस्थांच न ऐकल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. वेळ पडल्यास हिंजवडीत नेते आल्यास आमच्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी आम्ही आंदोलन करून रस्त्यावर उतरू असा इशारा देण्यात आला आहे. हे सर्व पाहता उपमुख्यमंत्री अजितदादा पवार काय निर्णय घेतात हे बघावं लागेल.

# घरकुलमध्ये अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

## अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान



**पिंपरी | प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठान आणि कीर्ती मारुती जाधव युथ फाऊंडेशन वतीने चिखली घरकुल येथे सफाई कर्मचाऱ्यांना सन्मानित करून तसेच विविध उपक्रमांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र निकाळजे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ब्रँड अँबेसिडर शिवाजी कन्हेरे, संस्कृती संवर्धन व राष्ट्रीय सेवक संघाचे सदस्य शिवानंद चौगुले, सुधाकर धुरी, अशोक मगर, दशरथ शिंदे, अजय पाताडे, महादेव कवितके, संतोष ठाकूर, सचिन सानप, अरुण पाडुळे, ऋषिकेश जाधव, बालाजी गायकवाड, तुषार सोनवणे,यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मारुती गणपत जाधव,प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष दीपक मोतेवाड, रोहित मोरे, प्रतिष्ठानचे सचिव पोपट आरणे, संदीप रोकडे तसेच खजिनदार सुरेश वैरागर, राहुल मोरे, महेंद्र कुमार गायकवाड,नरसिंग वैरागळ, संजय एडके, शांताराम खुडे, विलास गडसिंग, सुखदेव कापसे, शरद मोरे, धनंजय जाधव, संतोष जाधव, लालचंद अडागळे, विकास कांबळे, कुमार भोयाळ, खिलारे, कीर्ती जाधव, अरुणा भोसले, अभिजीत भोसले, रोहिणी रोकडे, मोरे वहिनी, संदीप दीक्षित, प्रसाद दौंडकर, सुदाम जाधव यांचे सहकार्य लाभले.

या उपक्रमांमध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची ख्याती याबद्दल जनजागृती करण्यात आली. वंचितांच्या, कामगारांच्या न्याय हक्काची बाजू आपल्या लेखनीने समर्थपणे मांडणारे लोकसाहित्यिक अण्णाभाऊ साठे यांचे विचार प्रत्येकाला उभारी देणारे आहेत, असेही यावेळी भाषणामधून सांगण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, भव्य बाईक रॅली काढण्यात आली.

# पिंपरी चिंचवड महापालिकेकडून प्रभाग रचना तयार

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून चार सदस्यीय 32 प्रभाग रचनेचे नकाशे तयार करण्यात आले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून चार सदस्यीय 32 प्रभाग रचनेचे नकाशे तयार करण्यात आले आहेत. तो नकाशा मान्यतेसाठी नगर सचिव विभाग त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविला जाणार आहे. प्रभाग रचना 22 ऑगस्टला प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रभाग रचना कशी असेल, याबाबत इच्छुकांसह माजी नगरसेवकांना उत्सुकता वाढली आहे.

फेब्रूवारी 2017 नंतर आत निवडणूक होत आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक होत आहे. त्यामुळे या निवडणुकीबाबत माजी नगरसेवकांसह इच्छुकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. प्रभाग रचना कशी असणार, याबाबत तर्कवितर्क लढविले जात आहे. महापालिकेच्या निवडणूक विभागाकडे त्याबाबत वारंवार विचारणा केली जात आहे. दरम्यान, महापालिका 12 मार्च 2022 पासून बरखास्त आहे. आयुक्त हे प्रशासक म्हणून 13 मार्च 2022 पासून संपूर्ण महापालिकेचे कामकाज पाहत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांचे पथक प्रभाग रचनेचे नकाशे तयार केले आहेत. प्रभाग रचना तळवडे-चिखली या भागांपासून सुरू होऊन सांगवी-दापोडी अशी उतरत्या क्रमाने करण्यात आली आहे.

शहराची सन 2011 ची जनगणना विचार घेऊन प्रत्येक प्रभागातील मतदारसंख्या निश्चित करण्यात आली आहे. प्रगणक गट (ब्लॉक) जुळवून प्रभाग रचनेचे नकाशे तयार करण्यात आले आहेत. त्यासाठी गुगल अर्थ मॅपचा आधार घेण्यात आला आहे. आवश्यतेनुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणीही करण्यात आली आहे.

आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे 22 ऑगस्टला प्रसिद्ध करून त्यावर हरकती व सूचना घेतल्या जाणार आहे. त्या 28 ऑगस्टपर्यंत स्वीकारल्या जातील. त्यावर 29 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर या कालावधीत सुनावणी घेतली जाईल. दरम्यान, नवीन प्रभाग रचना फेब्रुवारी 2017 च्या निवडणुकीनुसार असणार असल्याचे सांगितले जात आहे.




### एक जुलैपर्यंतची मतदार यादी ग्राह्य धरणार

» पिंपरी-चिंचवड शहराची 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 17 लाख 29 हजार 359 आहे. त्यानुसार प्रत्येक प्रभागात किमान 49 हजार आणि कमाल 59 हजार मतदार संख्येचा समावेश असणार आहे. त्यानंतर 15 वर्षांत लोकसंख्येत तसेच, मतदार संख्येत मोठी वाढ झाली आहे. शहरात 17 लाखांपेक्षा अधिक मतदार आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रभागात मतदार संख्या वाढणार आहे. एक जुलै 2025 ची मतदार यादी महापालिका निवडणुकीसाठी ग्राह्य धरली जाणार आहे. त्यानुसार त्या मतदार याद्या राज्य निवडणूक आयोगाकडून मागविण्यात आल्या आहेत. मतदार याद्या प्राप्त झाल्यानंतर त्या प्रभागनिहाय फोडल्या जाणार आहेत. त्या मतदार याद्या विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

### निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर

» पिंपरी-चिंचवड शहराचा 32 प्रभाग रचनेच्या मसुदा तयार झाला आहे. प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशा नगर विकास विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचनेला मान्यता मिळाल्यानंतर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाईल, असे महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

### पिंपरी-चिंचवड महापालिकेची प्रभाग रचना

- » चार सदस्यीय 32 प्रभाग
- » सन 2011 च्या जनगणनेनुसार 17 लाख 29 हजार 359 लोकसंख्या
- » मतदार यादी-1 जुलै 2025 पर्यंतची ग्राह्य धरणार
- » शहरात एकूण 17 लाख 751 मतदार
- » प्रभाग रचना 22 ऑगस्टला प्रसिद्ध होणार

# गणेश मंडळातील प्रसाद वाटपावर FDA ची नजर, बाहेरुन आणलेल्या मिठाईबाबत महत्त्वाचे निर्देश

## बाहेरुन आणलेल्या मिठाई अथवा प्रसादाची रितसर पावती अथवा नोंद ठेवावी लागणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक मंडळांकडून वाटप केल्या जाणाऱ्या प्रसादावर अन्न व औषध विभागाची नजर राहणार आहे. सार्वजनिक मंडळे प्रसाद तेथेच बनवणार असतील, तर त्याची ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे. तर, बाहेरुन आणलेल्या मिठाई अथवा प्रसादाची रितसर पावती अथवा नोंद ठेवावी लागणार आहे. दरम्यान, मंडळांनी रोजचा प्रसाद त्याच दिवशी वाटावा, स्वच्छता राखावी, अन्नपदार्थ व्यवस्थित हाताळावेत, अशा सूचना दिल्या आहेत. याबाबत लवकर सर्व मंडळांना कळविण्यात येणार असल्याचे अन्न व ऐषध प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 नियम व नियमन 2011 अंतर्गत गणेश मंडळांनी प्रसाद तयार करताना अथवा वाटताना काय काळजी घ्यावी, याबाबत अन्न व औषध विभागातंर्गत आवाहन करण्यात येते. मोठया थाटामाटात गणेशोत्सव साजरा केला जातो. या उत्सवात मंडळांकडून प्रसादाचे वाटप करण्यात येते. या उत्सव काळात वाटप करण्यात येणार प्रसादाबाबत दक्षता घेतली का, याची महत्त्वाची भूमिका एफडीएची असते.

गणेश मंडळांच्या सदस्यांनी अथवा प्रसाद हातळणाऱ्या व्यक्तींनी वैयक्तीक स्वच्छेताच्या सर्व नियमांची काळजी घ्यावी, प्रसाद तयार करण्यारया व्यक्तीने हात मोजे व ॲप्रन घालावा, केस पूर्णपणे झाकलेले असावेत व तोंडाला मास्क वापरावा, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबतची माहिती एफडीएकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील मोठया प्रमाणात अन्नदान करणाऱ्या धार्मिक स्थळांची एफडीएकडून पाहणी करण्यात आली असून, पाच धार्मिक स्थळांना प्रसाद वाटपासंबंधित प्रमाणपत्र देण्यात आले आहे.



### गत वर्षी 22 मंडळांनी केली होती नोंदणी

» सार्वजनिक मंडळांकडून वाटप होत असलेल्या प्रसाद, महाप्रसादाची माहिती कळवणे अन्न व ऐषध प्रशासनाकडून अनिवार्य करण्यात आले होते. त्यानुसार, गेल्या वर्षी 2024 मध्ये शहरातील फक्त 22 सार्वजनिक मंडळांनी याबाबत नोंदणी केली होती.

### ऑनलाईन नोंदणी अनिवार्य

» गणेश मंडळांनी प्रसाद वाटपासबंधित ऑनलाईन फॉस कॉस नोंदणी करणे अनिर्वाय आहे. त्यासाठी संबंधित मंडळाची नोंदणी व धर्मादाय आयुक्तांची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. तसेच, त्याचे शुल्कदेखील भरावे लागणार आहे. कच्चा माल खरेदीची बिल आणि परवानाधारक दुकानातून ते खरेदी करावे,.

# इथे ना पावती,ना नियम! पुण्यातले वाहनतळ की लुटीचे अड्डे?

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती, वैकुंठभाई मेहता संस्था 6 अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालवत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाढती वाहने आणि त्यानुसार वाढलेली वाहनतळांची गरज लक्षात घेता महापालिकेने शहरात अनेक ठिकाणी वाहनतळ उभारले. मात्र, या वाहनतळांवरील अनियमित कारभारामुळे पुणेकर त्रस्त झाले आहेत. वाहनतळचालकांकडून मनमानी रक्कम वसूल केली जात असून, काही ठिकाणी पावत्या न देता पैसे घेतले जात आहेत. शहरातील ही वाहनतळ लुटीचे अड्डे बनले आहेत. काही वाहनतळांवर तर महिनोन् महिने वाहने धूळ खात पडलेली असून, याकडे महापालिकेकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे 'पुढारी'च्या पाहणीत उघड झाले आहे

पुणे महापालिकेच्या विकास आराखड्यात भविष्यात वाढणारी वाहनांची संख्या लक्षात घेऊन सार्वजनिक ठिकाणी गाड्या लावण्यासाठी वाहनतळ बांधण्यात आले आहेत. शहरात 30 पेक्षा अधिक वाहनतळ महापालिकेमार्फत बांधण्यात आले आहेत. हे वाहनतळ चालवण्यासाठी महानगरपालिकेने ठेकेदारांना नेमले असून, त्यांच्याकडून महापालिकेला मोठे उत्पन्नदेखील मिळते. मात्र, हे ठेकेदार पालिकेचीच लूट करीत असल्याचे पाहणीत आढळून आले आहे. वाहनतळात गाडी उभी करण्यासाठी दुचाकीला प्रतितास तीन रुपये, तर चारचाकीसाठी 14 रुपये इतके शुल्क आकारले जाते. खासगी वाहनतळापेक्षा महापालिकेच्या वाहनतळाचे दर कमी आहेत.

यामुळे नागरिक या ठिकाणी पैसे देऊन वाहन लावण्यास पसंती देतात. मात्र, हे वाहनतळ चालवणारे ठेकेदार नागरिकांची लूट करीत आहेत. महापालिकेने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्तीचे

दर त्यांच्याकडून वसूल केले जातात. काही ठिकाणी तर नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांना पावत्याच दिल्या जात नाहीत. या वाहनतळात महिन्याचा पास देऊन वाहने लावण्यास परवानगी दिली जाते. याबाबत पालिकेकडे चौकशी केल्यास या ठेकेदारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणतीच यंत्रणा नसल्याचे समोर आले.



### ठेकेदारांकडे मोठी थकबाकी

» महानगरपालिकेने शहरात 30 पेक्षा जास्त वाहनतळ उभारले आहेत. या वाहनतळांतून महानगरपालिकेला उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे. मात्र, तसे होताना दिसत नाही. 4 कोटी 34 लाख 39 हजार रुपयांचे उत्पन्न मिळणे अपेक्षित असताना गेल्या काही वर्षांत 1 कोटी 16 लाख 93 हजार रुपयांचे उत्पन्न महानगरपालिकेला मिळाले आहे. गेल्या तीन महिन्यांत 46 लाख 35 हजार रुपयांची थकबाकी या वाहनतळचालक ठेकेदारांकडे आहे.

### जागेची अडवणूक

» लक्ष्मी रस्ता भागातील वाहनतळ हे येथे खरेदी करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना त्यांची वाहने पार्क करता यावी, या हेतूने बांधण्यात आले आहे. मात्र, आजूबाजूचे नागरिक महिन्याचा पास घेऊन जणू काही आपल्याच सोसायटीचे पार्किंग असल्यासारखा वाहनतळाचा वापर करत आहेत. अनेक दिवस गाड्या उभ्या केल्या जात असल्याने अशा अनेक गाड्यांनी सामान्य पुणेकरांची जागा अडवली जात असल्याचे पाहणीत आढळले.

### पाहणीत काय आढळले ?

- » महापालिकेच्या वाहनतळांवर दरपत्रक नाही
- » पावत्या न देता नागरिकांकडून पैशांची वसुली
- » सोयी-सुविधांचा अभाव अनेक वाहने धूळ खात
- » ठेकेदारांच्या कर्मचाऱ्यांकडून उर्मट वागणूक
- » तळीरामांचा वाहनतळ परिसरात वावर
- » वाहनतळांचा खासगी मालमत्तेप्रमाणे वापर
- » दरपत्रकात मोठी तफावत

# कुरुळी ते चाकण एमआयडीसी रस्त्याची चाळण..

## कुरुळी गावठाण ते चाकण एमआयडीसी कडवस्ती रस्त्याची चाळण झाली आहे, या रस्त्याची त्वरित रस्त्याची करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

कुरुळी (ता. खेड) येथील कुरुळी गावठाण ते चाकण एमआयडीसी कडवस्ती रस्त्याची चाळण झाली आहे. या रस्त्याची त्वरित रस्त्याची करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पुणे नाशिक महामार्ग ते कड वस्ती एमआयडीसी रस्ता सुमारे दोन किमी अंतर असून सकाळी आणि सायंकाळी पुणे नाशिक मार्गावरती होणारी वाहतूक कोंडीमुळे या रस्त्याने मोठ्या प्रमाणात कामगारांच्या बसेस मालवाहतूक गाड्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावरून वाहतूक करत असतात.

या रस्त्यावर असणाऱ्या इंग्लिश मीडियम स्कूल,प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात संघर्ष करत शाळेपर्यंत पोहोचावे लागते या मार्गावरती दररोज छोटे-मोठे अपघात होत आहेत. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला असणाऱ्या साईट पट्ट्या खचल्या असून पायी चालणे अवघड झाले आहे. ओढ्याचे पाणी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यावर रस्त्यावर येते.

पुणे नाशिक महामार्ग ते कड वस्ती एमआयडीसी रस्ता सुमारे दोन किमी अंतर असून सकाळी आणि सायंकाळी पुणे नाशिक मार्गावरती होणारी वाहतूक कोंडीमुळे या रस्त्याने मोठ्या प्रमाणात कामगारांच्या बसेस मालवाहतूक गाड्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावरून वाहतूक करत असतात.या रस्त्यावर असणाऱ्या इंग्लिश मीडियम स्कूल, प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय येथील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात संघर्ष करत शाळेपर्यंत पोहोचावे लागते या मार्गावरती दररोज छोटे-मोठे अपघात होत आहेत.



"कुरुळी गावठाण ते चाकण एमआयडीसी कडवस्ती रस्त्याची चाळण झाली आहे. कुरुळी ते कडवस्ती रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या साइडपट्ट्या, गटार, खड्डे याबाबत कायम स्वरुपी उपाययोजना करण्यात यावी यासाठी प्रशासन आणि लोक प्रतिनिधी यांनी प्रमाणिकपणे मनापासून काम करण्याची गरज आहे; अन्यथा कुरुळी ग्रामस्थ रस्त्यावर येऊन आंदोलन करतील."

- रमेश बागडे, माजी चेअरमनविविध कार्यकारी सोसायटी कुरुळी

"कुरुळीगावठाण ते चाकण एमआयडीसी कडवस्ती रस्त्यावर असणाऱ्या ओढ्याच्या पाणी पातळीत वाढ झाल्यावर आनंद इंग्लिश मीडियम स्कूल समोर रस्त्यावर पाणी येते. त्यामुळे खड्डे पडले असून या कामाबाबत ग्रामपंचायत सरपंच यांनी अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना पत्र व्यवहार केला आहे; परंतु अधिकारी लक्ष देत नाहीत."

- कविता कोतवाल, ग्रामआधिकारी